# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## अहवाल

## शै. वर्ष २०१६-१७

अहवाल मिळाला / विनियोग प्रमाणपत्र जमा केले नाहि
7/4/17 जमा करून घेतले नाही
7/4/017
ASSISTANT PROFESSOR
Dept. of Lifelong Learning & Extension
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad-431 004

समन्वयक
केंद्र
कालिकादेवी वरिष्ठ महाविद्यालय
शिरूर कासार, जि.बीड.

प्राचार्य
Principal
Kalikadevi Art's, Comm. & Sci. College
Shirur (Ka), Dist.Beed.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| उपक्रमाचे नाव | पान. न. |
|---|---|
| महाविद्यालयीन स्तरावरील कार्यक्रम | 3 |
| समाजस्तरावरील कार्यक्रम | 7 |
| विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर | 8 |
| बातमी | 21 |
| छायाचित्रे | 11 |


Scanned by CamScanner

# आजीवन शिक्षण व विस्तार विभाग अहवाल

# शै. वर्षे २०१६-१७

# महाविद्यालय स्तर

कालिकादेवी महाविद्यालय, शिरुर (का.) जि. बीड अंतर्गत आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने शै. वर्षे २०१६-१७ मध्ये महाविद्यालय स्तर, समाजस्तर आणि विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर अशा प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात आले. ते खालील प्रमाणे आहेत.

दि. 16 जुन 201 रोजी महाविद्यालयातील सांस्कृतीक सभागृहात छत्रपती शाहु महाराज यांची जयंती साजरी करण्यात आाली या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने या होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. संजय तुपे हे होते. ते बोलतांना पुढे म्हणाले की, छत्रपती शाहू महारारज हे जातिअंताचे पुरस्करते होते. ते जसे बोलले तसे वागण्याचा प्रयत्न ते आपल्या कृतीतून दाखवून देत उदा. गंगाराम कांबळे सारख्या चांभार समाजाच्या व्यक्तीला हॉटेल टाकून देणे फक्त हॉटेल टाकून देवून न थांबता ते स्वतः हॉटेल मध्ये आपल्या लवाजम्या सोबत जावून चहा जेवन करत आणि सर्व समाजाला म्हणत की, गंगाराम यांच्या हातचे जेवन घेणे म्हणजे खरा आनंद आहे. अशा प्रकारे जातीभेद, अस्पृशता निवारण करण्याचे काम शाहू महाराज करत.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे समन्वयक प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले तर आभार प्रा. रमेश लाहोटी यांनी मानले.

दि. 14 जुलै 2016 रोजी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या वतीने महाविद्यालयीन स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छता ही माणसाच्या जीवनातील महत्वाचा घटक आहे. स्वच्छतेमुळे आजूबाजूच्या परीसरात वातावरन प्रसंन रहाते. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. देशमाने मॅडम यांनी केले. या वेळी मोठया प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

दि. 01 ऑगस्ट 2016 रोजी महाविद्यालयातील अजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने या होत्या त्याच बरोबर विचार पिठावर डॉ. संजय तुपे, प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. अशोक घोळवे, हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. उध्दव चौधर यांनी केले तर आभार प्रा. नवनाथ पवळे यांनी मानले.



Scanned by CamScanner

दि. 15 ऑगस्ट 2016 रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभाग व लोकप्रशान विभागाच्या वतीने **प्रशासननामा** हे भितीपत्रक उच्च शिक्षणावर आधारीत काढण्यात आले. याचा उद्देश आसा की, मुलांना आपण **विस्तार समता सेवक** म्हणून काय कार्य केले याचे मुल्यमापन करण्यासाठी दर तीन महिण्याला आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि लोकप्रशासन विभागाचे मुखपत्र म्हणून प्रशासननामा हे भितीपत्रक काम करतांना दिसून येते. यात विस्तार सेवेचे समाता सेवक मोठया प्रमाणात सहभागी होतात.

दि. 08 सप्टेंबर 2016 रोजी महाविद्यालयाच्या वतीने **आंतराष्ट्रीय साक्षरता दिन** साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यासाठी समान्यज्ञान, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. देशामाने पी.बी. या उपस्थित होत्या. परिक्षक म्हणून डॉ. शाम सानप, प्रा. खंडूजी वाघमारे हे होते. या स्पर्धेत मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. त्यातील निबंधस्पर्धेत प्रथम, अक्षय यादव, द्वितीय आरती जगताप तर तृतीय- औसरमल अक्षता यांनी क्रमांक मिळविले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व नियंत्रन प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. रमेश लांडगे यांनी मानले. दि. 04 आक्टोंबर 2016 रोजी संस्थेच्या संस्थापिका सौ. केशरबाई क्षीरसागर (काकू) यांच्या निर्वान दिन साजरा करण्यात आला. या वेळी मा. प्राचार्य बोलतांना म्हणाल्या की, काकू फक्त 7 वी शिकल्या पण ज्ञानाचा प्रकाश सर्व जिल्हयाला देण्याचे काम काकूनी केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा डॉ. मांडे यांनी तर आभार खंडू वाघमारे यांनी मानले.

दि. 15 आक्टोंबर 2016 रोजी महाविद्यालयाच्या वतीने ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने या अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. त्या बोलतांना म्हणाल्या की, भारत देशासाठी ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे फार मोठे योगदान आहे. त्यात शिक्षण, तंत्रज्ञान, संसदीय लोकशाही इ. क्षेत्रात त्यांचे योगदान आपणास दिसून येते.

या प्रसंगी विचार पिठावर डॉ. संजय तुपे, कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल जाधव हे उपस्थित होते. त्याच बरोबर रा.से.यो. चे डॉ. अशोक घोळवे, प्रा. उध्दव चौधर हेही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विठ्ठल गुंडे तर आभार प्रा. रमेश घाडगे यांनी मानले.



Scanned by CamScanner

दि. 30 आक्टोंबर 2016 रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग व लोकप्रशासन विभागाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या परिसरात **वृक्षारोपन** करण्यात आले. या प्रसंगी आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासकीय आधिकारी डॉ. राजेशजी मचाले यांच्या हस्ते परीसरात वृक्षारोपन करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने, प्राचार्य राऊत, इंजिनियर देशमाने, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मा. काटे, डॉ. संजय तुपे, समन्वयक विठ्ठल जाधव हे उपस्थित होते. महाविद्यालयातील वृक्षारोपनाचा उद्देश असा की, विद्यार्थ्यांना सर्व वनस्पतींची माहिती व्हावी व परीसरात प्रसंन्न व स्वच्छ वातावरण रहावे यासाठी वनस्पती उद्यानाची निर्मिती करण्यात आली. यात आयुर्वेदिक वनस्पतींची व फळझाडांची वृक्ष लागवड करण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फुलझाडे, फळझाडे व वनस्पती युक्त झाडांची लागवड करण्यात आली. या प्रसंगी गावातील नागरीक व विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक वर्ग आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

दि. 26 नोव्हेंबर 2016 रोजी महाविद्यालयाच्या वतीने **संविधान दिन** साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने या होत्या. या प्रसंगी मोनीका गाडेकर या विद्यार्थीनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. सर्व समुहाने त्या विद्यार्थीनीच्या पाठीमागे वाचन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राम गांगर्डे यांनी केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. देशमाने पी.बी. यांनी मार्गदर्शन करतांना बोलल्या की, संविधानाविषयी प्रत्येकाला आदर व माहिती असणे आवश्यक आहे. देशामध्ये प्रत्येक मानुस आधीकार सांगतो परंतू त्याने कर्तव्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. देशातील प्रत्येक नागरीक व विशेषताः तरुण पिढीने संविधानाविषयी सखोल ज्ञान सपादन केले पाहिजे. सामान्य मानसाला संविधाना विषयी जागृत करणे तरुण पिढीचे काम आहे.

या प्रसंगी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. उध्दव चौधर यांनी केले तर आभार डॉ. शामा लोमटे यांनी मानले. या कार्यक्रम यशस्वी करण्यात विस्तार समता सेवकांनी तसेच कार्यक्रम अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

दि. 06 डिसेंबर 2016 रोजी बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनीर्वाण दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी विचार पिठावर प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने, समन्वयक प्रा. विठ्ठल जाधव हे उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. देशमाने मॅडम म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून कृतीत आचरणात व वर्तनात आणलेच पाहिजेत. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विस्तार समता सेवक रामसिंग गडदे तर आभार समता सेविका आश्विनी पुरी हिने मानले.

Scanned by CamScanner

दि. 03 जानेवारी 2017 रोजी सावित्रीमाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शामा लोमटे, प्रा. राम गांगर्डे, प्रा. विठ्ठल जाधव आणि सामाजिक कार्यकर्ते अक्षय फुलवळे हे उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या स्वंयसेवी संस्थेचे सांगताना नेत्रदानाचा फायदा सांगून मुलांनाकडून नेत्रदानासंदर्भातील फॉर्म भरून घेण्यात आले. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांपैकी 34 मुलांनी नेत्रदानाचे फॉर्म भरून नेत्रदान करण्याचा संकल्प केला.

Scanned by CamScanner

# समाजस्तर

दि. 01 जुलै 2016 रोजी महाविद्यालयाच्या वतीने शिरुर (का.) शहरात वृक्ष दिंडी काढण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.बी. काटे डॉ. संजय तुपे व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. विठ्ठल जाधव, रा.से.यो. प्रमुख डॉ. अशोक घोळवे, यु.न. चौधर दिंडीत सहभागी झ ाले. या नंतर महाविद्यालयाच्या परीसरात **झाडे लावा झाडे जगवा** या घोषणेद्वारे त्याचा प्रचार प्रसार करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्रमुख प्राध्यापक व कर्मचारी आणि विद्यार्थी वृक्ष दिंडीत सहभागी झाले होते.

दि. 15 जुलै 2016 रोजी महाविद्यालयाच्या वतीने समाजस्थरावर **उच्च शिक्षण जागृती अभियान** राबविण्यात आले. यात वारणी, लोणी, उंबरमुळी, सिंदफना, मानूर, बारगजवाडी इ. गावात उपरोक्त अभियान राबविण्यात आले.

**वारणी :**

या गावात गेल्यानंतर प्रथम चौकातील मुख्य हानुमान मंदिराच्या प्रागणात गावकऱ्यांना बोलविण्यात आाले. या प्रसंगी प्रास्ताविक करतांना प्रा. विठ्ठल जाधव म्हणाले की, आम्ही तुमच्या पाल्यांच्या भल्यासाठी तुमच्या गावात आलो आहोत. तुम्ही तुमच्या मुलाला उच्च शिक्षण दिल्यास आजही प्रत्येक विभागात प्रथम श्रेणीच्या नोकऱ्या उपलब्ध आहेत. मुलांनी महाविद्यालयात रोज येवून प्राध्यापकांच्या तासिका करणे त्याच बरोबर ग्रंथालयातून पुस्तके घेवून ज़ाने, प्रकल्प करणे, उपक्रमात सहभागी होणे इ. सर्व गोष्टी केल्यास तुम्हाला ज्ञान संपादित होते. आणि तुम्ही सर्व गोष्टी मध्ये निपून होण्यात मदत होते.

**लोणी :**

या गावात पालकांना आम्ही शेतात खुरपणी करतांना संपर्क केला. या प्रसंगी पालक महिला गहिवरून गेल्या. या प्रसंगी प्रा. विठ्ठल जाधव यांनी तसेच प्रा. वाघमारे, प्रा. राज कोरडे, प्रा. नवानाथ पवळे इ. प्राध्यापकांनी त्यांच्याशी संवाद साधला.



Scanned by CamScanner

**मानूर**

या गावी आम्ही पालकांना संपर्क केला असता त्यांनी आम्हास मुल न येण्याची कारणे सांगितली. त्यात दुष्काळी परिस्थीती मुळे मुलांना मजूरी, कंपणी, शेती इ. कामे करावी लागतात. म्हणून 12 वी पर्यंत येतात. त्यांनतर पालकांची उच्च शिक्षण प्रक्रियेत मुलांना पाठवण्याची मानसिकता बदलने गरजेचे आहे. या प्रसंगी पालकांना उच्च शिक्षणातील संधीक्षेत्रे इ. माहिती दिली.

दुसऱ्या दिवशी उ**बंरमुळी, बारगजवाडी व सिंदफना** या गावात उच्च शिक्षण जागृती अभियान राबविण्यात आले.

**दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर**

दि. 29,30 नोव्हेंबर 2016 रोजी महाविद्यालयात **दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर** संपन्न झाले. प्रथम सत्रात **उद्‌घाटक व प्रमुख मार्गदर्शक डॉ. संजय मुन (संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.)** हे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. संजय मुन म्हणाले की, विस्तार कार्य करतांना विद्यार्थ्यांनी समाज कार्याचा वसा म्हणून स्विकार करून आजीवन परिवर्तनाचा ध्यास घ्यावा. हा संदेश दिला. क्रांती सुर्य ज्योतीराव फुले, छत्रपती शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा कृतीजागर करून विस्तार कार्याची वाढ करावी. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग आपल्या समास्या, प्रश्न सोडविण्यासाठी केला तरच त्या शिक्षणाचा विस्तार होईल असे मत विद्यापीठाचे संचालक डॉ. संजय मुन यांनी व्यक्त केले. ते शिरुर तालूक्यातील कालिकादेवी महाविद्यालयातील दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. देशमाने, डॉ. संजय तुपे, प्रा. विठ्ठल जाधव, टी.एस. पठाण आदि उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक समन्वयक प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले. पुढे बोलतांना डॉ. संजय मुन म्हणाले की, काळ बदलत आहे. बदलत्या काळातील प्रश्नांची उक्कल अशा शिबीरातून केली जाते. तसेच विद्यार्थ्यांचा समाज जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोण बदलण्यासाठी अशी शिबीरे उपयुक्त आहेत. वेगवेगळया सामाजीक प्रश्नांना सामोरे जाण्याचे बळ या शिबीरातून मिळते. शिक्षणाला राष्ट्रीय समस्या समजून आजपर्यंत देशात शिक्षणाची आखणीच झाली नाही अशी खंत डॉ. संजय मुन यांनी यावेळी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अश्वीनी पुरी या विद्यार्थीनीने केले. तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. राम गांगर्डे यांनी मानले.

याच दिवशी दुसऱ्या सत्रात प्रा. राम देशमुख यांनी स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शन केले. यात राज्यसेवा,



Scanned by CamScanner

एसटी.आय., पी.एस.आय., असिस्टंट या परिक्षांच्या पुर्व परीक्षेचे नियोजन कसे करावे त्याच बरोबर त्यांनी कला शाखा घटक, विज्ञान, बुध्दीमापन चाचणी, मराठी व्याकरण, चालू घडामोडी इ. मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतांना कधीही सकारात्मक दृष्टीकोण असावा. असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्ष स्थानावरून प्रा. विठ्ठल गुंडे यांनी प्रमुख मार्गदर्शकांच्या मुद्यांचा धागा पकडून त्यांनी ध्येय ठरवा, नियोजन करा व यश मिळवा हा राज मार्ग त्यांनी विद्यार्थ्यांना दाखविला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. नवनाथ पवळे तर आभार डॉ. राज कोरडे, यांनी मानले.

दि. 30 नोव्हेंबर 2016 रोजी प्रथम सत्रात सकाळी 10 ते 12 या वेळेत मा. प्रशांत ससाने (आय.टी.आय.) शिरुर (का.) येथील अधिकारी यांनी **कौशल्य व व्यक्तीमत्व विकास** या विषयावर मार्गदशन केले. ते म्हणाले की, आपल्या आवडीनुसार करिअर निवडावे. त्यात मोटार रिवायडिंग, मिलराईट मेन्टेनंनस, सेन्सी ऑपरेटिंग या प्रकारचे नविन ट्रेड आपल्याकडे आहेत. हे कौशल्य पुर्ण ट्रेड केल्यास नोकरी हमकास लागते. कोणतेही कोर्स हे आवडीने केल्यास त्यात कोणताही आंनद येतो व आपल्याकडून नाविण्यपुर्ण काहीतरी घडवून येईल.

याच दिवशी दुपारच्या सत्रात 1 ते 3 या वेळेत मा. अरुण फुलवरे (प्रतिष्ठीत व्यवसायीक) यांनी मार्गदशन केले. यावेळी त्यांनी युवकांना असे आवाहन केले की, कोणताही व्यवसाय करतांना तुम्ही नियोजन सल्ला व गुंतवनूक यांची माहिती घेवून तुम्ही व्यवसायाची सुरूवात केली पाहिजे त्यात सेवा सातत्य, विश्वास त्याच बरोबर भाडवल उभारणी, आर्थिक नियोजन या सर्व गोष्टींचे प्रशिक्षण, माहिती होणे आवश्यक आहे.

या सत्राचे अध्यक्ष डॉ. अशोक घोळवे यांनी दुग्धव्यवस्थापन संबंधी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, हा व्यवसाय शहरी व ग्रामीण भागातील मुख्य घटक असल्याचे जानवते. तो शहरी व ग्रामीण भागात वेगवेगळया प्रकारे व्यवसाय करता येतो. त्यात किराणा, व्यापारी, कुकुटपालन, शेतीला व्यवसायाचे स्वरूप दयावे इ. विषयावर आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बी.टी. पवार यांनी केले तर आभार डॉ. सुधीर येवले यांनी मानले. अशा प्रकारे दोन दिवशीय शिबीराचा समारोप झाला.

दि. 03 फेब्रुवारी 2017 रोजी पाडळी या गावी **संविधान साक्षरता अभियान** राबवीण्यात आले. या प्रसंगी विस्तार समाता सेवकांनी संविधान साक्षरता रॅली काढली. या वेळी संविधानाचा विजय असो, **संविधान संस्कृती वाढवा-भारत घडवा** अशा घोषणा देत सर्व पाडळी गावात फेरी द्वारे संविधान साक्षरता अभियान चालविण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. चेतना डोंगळीकर, डॉ. शामा लोमटे, डॉ. अशोक घोळवे, प्रा. उध्दव चौधर, प्रा. सय्यद अफरोज आदि सर्व विभागांचे प्रा. या वेळी रॅलीत सहभागी झाले.



Scanned by CamScanner